प्रेस नोट

स्था.गु.शा.जळगाव
दि.१४.२.१८

प्रति,
संपादक
-------------------

**विषय** - मोटार सायकली चोरी करणारे स्थानिक गुन्हे शाखे करवी जेरंबद

दिनांक १४/२/१८ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल कुराडे स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना बांभोरी ता. धरणगावं येथिल दिपक श्रावण सपकाळे हा मोटार सायकली चोरुन त्याची विक्री करतो बाबत गोपनिय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली होती.

सदर बाबत मिळालेल्या बातमी वरुन मा. पोलीस अधिक्षक सो जळगाव श्री दत्तात्रय कराळे , अपर पोलीस अधिक्षक सो जळगाव श्री बच्चनसिंग , अपर पोलीस अधिक्षक सो चाळीसगाव श्री प्रशांत बच्छाव यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल कुराडे स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांनी स.फौ. मनोहर देशमुख, उत्तमसिंग पाटील, पोहेकॉ विनोद पाटील ,पोना रामचंद्र बोरसे, गफ्फार तडवी, योगेश पाटील, पोकॉ मनोज दुसाने, महेश पाटील, सुशिल पाटील पोड्रा पोना दिपक पाटील, प्रविण हिवराळे अश्याचे पथक तयार करुन सदर पथकास मार्गदर्शन करुन सुचना दिल्या होत्या

सदर पथकाने मिळालेल्या बातमी नुसार बातमीतील नमुद इसमाचा बांभोरी ता. धरणगाव गावी जावुन सापळा रचुन दिपक श्रावण सपकाळे यास बांभोरी गांवातील बस स्टॅन्डवर एक बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटार सायकल सह मिळुन आला त्यास सदर मोटार सायकल बाबत विचारपुस करता त्याने सदर मोटार सायकल सुमारे १५ दिवसापुर्वी जळगाव शहरात सिव्हील हॉस्पीटल येथुन त्याचा साथीदार किरण राजेद्र सपकाळे याचे सह चोरी केली होती बाबत सांगितले होते.

तसेच दिपक श्रावण सपकाळे यास अधिक विचारपुस करता त्याने मी स्वत सुमारे ३ महीन्यापुर्वी भुसावळ शहरात पांडुरंग टॅाकीज भागातुन एक बजाज प्लॅटीना मो.सा. व नहाटा चौफुली जवळुन एक हिरोहोन्डा कंपनीची स्पेल्डर प्लस मो.सा. व सुमारे ८ दिवसापुर्वी जळगाव शहरात हॅाटेल रॅायल पॅलेस समोरुन एक हिरोहोन्डा कंपनीची सिडी डिलक्स मोसा अश्या एकुण ४ मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने सदर ४ मोटार सायकली किंमत रुपये ७५०००/- च्या जप्त करण्यात आलेल्या आहेत .

तसेच आरोपी दिपक श्रावण सपकाळे याचा साथीदार किरण राजेद्र सपकाळे याचा शोध घेता तो बांभोरी येथे मिळुन आल्याने दोघही आरोपीतांना जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग ५ गुरन २०/१८ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्ह्याचे तपास कामी मोटार सायकल सह ताब्यात देण्यात आले आहे.

तसेच सदर आरोपी दिपक श्रावण सपकाळे याचे विरुध्द यापुर्वी जिल्हापेठ व रामांनदर नगर पोलीस स्टेशनला मोटार सायकल चोरीचे गुन्हे दाखल आहेत. आरोपी हा मोटार सायकल चोरी करणारा सराईत गुन्हेगार आहे

**(सुनिल कुराडे)**
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव


MH 19 CL 1916